महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०५२१/प्र.क्र.०३/२०२३/जाहिरात दिनांक: ३० मे, २०२३

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : सहायक आयुक्त, समाज कल्याण व तत्सम, गट-अ**
**संदर्भ : जाहिरात क्रमांक-०२३/२०२३**

शासनाच्या, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत सहायक आयुक्त, समाज कल्याण व तत्सम, गट-अ या संवर्गातील ४१ पदांच्या भरतीकरीता आयोगामार्फत दिनांक १० मे, २०२३ रोजी जाहिरात (जाहिरात क्रमांक ०२३/२०२३) प्रसिध्द करण्यात आली आहे. जाहिरातीमध्ये दिनांक ४ मार्च, १९८० च्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदींनुसार शैक्षणिक अर्हता नमूद करण्यात आली आहे. तथापि, प्रस्तुत सेवा प्रवेश नियमास अनुसरुन दिनांक १० जून, १९८० रोजी शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले असल्याबाबत तसेच प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित झाल्याबाबत शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या क्रमांक सकअ-२०१६/प्र.क्र.३५९/आस्था-२, दिनांक २२ मे, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास कळविण्यात आले आहे. सदर दिनांक २२ मे, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार जाहिरातीमधील शैक्षणिक अर्हता तसेच वेतनश्रेणीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत:-

**(१) सुधारित शैक्षणिक अर्हता -**

**(1)** Possess a degree in at least the Second Class of a Statutory University; **AND**

**(2)** Possess two years post graduate diploma or degree in Social Work or Social Welfare Administration of a recognised University or Institute or Second Class post graduate Diploma or degree in Social Work or Social Welfare Administration of a recognised University.

**(२) सुधारित वेतनश्रेणी** - वेतन स्तर - एस-२० रुपये ५६,१००/- ते रुपये १,७७,५००/- अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते.

२. सुधारित शैक्षणिक अर्हतेनुसार, अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून जाहिरात क्रमांक ०२३/२०२३ ला अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक** | दिनांक १२ जून, २०२३ रोजी २३.५९ |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक** | दिनांक १२ जून, २०२३ रोजी २३.५९ |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक** | दिनांक १४ जून, २०२३ रोजी २३.५९ |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | दिनांक १५ जून, २०२३ रोजी २३.५९ |

३. जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

४. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०२३/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.